KANSHIRAM RESEARCH CENTRE KRC No. Dt. M.9373102942 Uttam Shewde 4, New Kailashnagar, Nagpur-440027

# निवडणूक आचार संहिता : मार्गदर्शक तत्वे

निवडणूक आयोगाची उमेदवार व राजकीय पक्षांसाठी आदर्श आचारसंहिता असून त्यासंबंधीची मार्गदर्शक तत्वे पुढीलप्रमाणे आहेत.

## " काय करावे "

(१) चालू असलेले कार्यक्रम पुढे सुरु ठेवता येतील.

(२) ज्या विषयी शंका निर्माण होईल अशा बाबींच्या संबंधात, भारत निवडणूक आयोग/राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण/मान्यता प्राप्त करण्यात यावी.

(३) पूर, अवर्षण, साथीचे रोग किंवा अन्य नैसर्गिक आपत्ती यामुळे बाधित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी सहाय्यकारी व पुनर्वसनाच्या उपाययोजना चालू करता येतील व त्या पुढे सुरु ठेवता येतील.

(४) मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रक्कम किंवा वैद्यकीय सवलती देण्याचे समुचित मान्यतेने पुढे चालू ठेवता येईल.

(५) मैदानासारख्या सार्वजनिक जागा सर्व पक्षांना/निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांना निवडणूक सभा घेण्यासाठी निःपक्षपातीपणे उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे सर्व पक्षांना/ निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांना हेलिपॅडचा वापर निःपक्षपातीपणे उपलब्ध करून दिला पाहिजे.

(६) विश्रामगृहे, डाकबंगले व इतर शासकीय निवासस्थाने, सर्व राजकीय पक्षांना व निवडणुकीस उभे असलेल्या सर्व उमेदवारांना समानतेच्या तत्वावर उपलब्ध करून देण्यात यावेत.

(७) इतर राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांच्यावर करण्यात येणारी टीका, त्यांची धोरणे, कार्यक्रम, पूर्वीची कामगिरी, पार पाडलेली कामे, केवळ याबाबींशी संबंधित असावी.

(८) शांततामय व उपद्रवरहीत गृहस्थजीवन जगण्याच्या प्रत्येक व्यक्तीचा अधिकाराचे पूर्णपणे जतन करण्यात यावे.

(९) इतर पक्षांनी आयोजित केलेल्या सभा व मिरवणुकीमध्ये कोणतेही अडथळे निर्माण करण्यात येऊ नयेत.

(१०) प्रस्तावित सभेची जागा व वेळ याविषयी स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना पूर्ण माहिती देण्यात यावी आणि अशी सर्व परवानगी मिळण्यात यावी.

(११) प्रस्तावित सभेच्या जागी निर्बंधात्मक व प्रतिबंधक आदेश जारी केलेले असल्यास त्यांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. आवश्यक असल्यास त्याबाबत सवलत मिळविण्याविषयी अर्ज केले पाहिजेत व वेळीच अशी सवलत मिळवली पाहिजे.

(१२) प्रस्तावित सभेची ध्वनीवर्धक किंवा कोणत्याही इतर अशा सवलतीचा वापर करण्यासाठी परवानगी मिळविली पाहिजे.

(१३) सभेमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा अन्यथा अव्यवस्था निर्माण करणाऱ्या व्यक्तीबरोबर व्यवहार करण्यासाठी पोलीसांचे सहाय्य मिळविण्यात यावे.

(१४) कोणत्याही मोर्चाच्या प्रारंभीची वेळ व जागा, मोर्चा ज्या मार्गानी जाईल तो मार्ग व मोर्चाची अखेर होईल अशी वेळ व स्थान ही बाब आगाऊ स्वरुपात निश्चितपणे ठरविण्यात यावी व पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी.

(१५) मोर्चा ज्या वस्तीमधून जावयाचा असेल त्या वस्त्यांबाबत कोणतेही निर्बंधात्मक आदेश जारी केलेले असल्यास त्याविषयी खात्री करून त्यांचे पूर्णपणे अनुपालन करण्यात यावे. त्याचप्रमाणे सर्व वाहतूक नियमांचे व अन्य निर्बंधाचे अनुपालन करण्यात यावे.

(१६) मोर्चामुळे वाहतुकीस कोणताही अडथळा निर्माण होऊ देऊ नये.

(१७) ज्यांचा क्षेपके किंवा हत्यारे म्हणून गैरवापर होऊ शकेल अशा कोणत्याही वस्तू मोर्चात सहभागी असलेल्या व्यक्तींनी बाळगू नयेत.

(१८) मतदानाचे काम शांतता व सुव्यवस्थेने पार पाडावे यासाठी सर्ववेळी सर्व निवडणूक अधिकाऱ्यांना सहकार्य देण्यात यावे.

(१९) बिल्ले व ओळखपत्र, निवडणुकीचे काम करणाऱ्या व्यक्तींनी ठळकपणे लावली पाहिजेत.

(२०) मतदारांना देण्यात येणाऱ्या ओळखचिठ्या या साध्या (पांढऱ्या) कागदावर देण्यात येतील व त्यावर कोणतेही चिन्ह उमेदवारांचे किंवा पक्षाचे चिन्ह यांचा उल्लेख असणार नाही.

(२१) मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापरातील निर्बंधाचे पूर्णपणे पालन करण्यात येईल.

(२२) निवडणूक आयोगाचे वैध प्राधिकारपत्र असल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही वेळी मतदान कक्षात प्रवेश करता येणार नाही. वरच्या दर्जाच्या कोणत्याही व्यक्तींना (उदा. मुख्यमंत्री, मंत्री, संसद सदस्य, विधानसभा सदस्य) यांनाही यातून सूट देण्यात आलेली नाही.

(२३) निवडणूक पार पाडण्याच्या संबंधातील कोणतीही तक्रार किंवा समस्या, निवडणूक निर्णय अधिकारी/क्षेत्र/प्रभाग/दंडाधिकारी यांच्या किंवा भारत निवडणूक आयोग यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल.

(२४) निवडणूक आयोग/निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे निवडणुकीच्या विविध पैलूंच्या संबंधातील सर्व बाबीविषयीचे निदेश/आदेश/अनुदेश यांचे पालन करण्यात येईल.

CamScanner

## "काय करू नये"

(१) शासकीय वाहने किंवा कर्मचारी वर्ग किंवा यंत्रणा यांचा निवडणूक प्रचाराविषयक कामांसाठी वापर करण्यात येऊ नये. शासकीय वाहनात पुढील कार्यालयाच्या वाहनांचा समावेश असेल. १) केंद्र शासन, २) राज्य शासन, ३) केंद्र व राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, ४) केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त क्षेत्रातील उपक्रम, ५) स्थानिक संस्था, ६) महानगरपालिका, ७) नगरपालिका, ८) पणन मंडळे (कोणत्याही नावाची), ९) सहकारी संस्था, १०) स्वायत्त जिल्हा परिषदा किंवा ११) ज्यामध्ये सार्वजनिक निधी मग तो एकूण निधीच्या हिस्स्यातील कितीही अल्पांशाने असो, गुंतवण्यात आला आहे अशी कोणतीही संस्था तसेच १२) संरक्षण मंत्रालयाच्या मालकीची आणि गृह मंत्रालय व राज्य शासनाच्या केंद्रीय सशस्त्र पोलीस बलाच्या मालकीची असलेली पुढील वाहने - अ) मालमोटारी, ब) लॉरी, क) टेम्पो, ड) जीपगाड्या, इ) मोटारगाड्या, फ) ऑटोरिक्षा, ह) विमाने, य) हेलिकॉप्टर, ज) जहाजे, के) बोटी, ल) हॉवरक्रॉफ्ट व इतर सर्व वाहने.

(२) सत्तेमध्ये असलेला पक्ष/शासन यांनी सध्या केलेल्या उद्दिष्टाबाबत सरकारी कोषगाराच्या खर्चाने कृपया कोणतीही जाहिरात देऊ नये.

(३) कोणत्याही वित्तीय अनुदानाची घोषणा करणे, कोनशिला बसविणे, नवीन रस्ते इत्यादी बांधण्याचे वचन देणे इ. गोष्टी करू नयेत.

(४) शासन/सार्वजनिक उपक्रम यांच्या सेवेत कोणत्याही तदर्थ नियुक्त्या करू नयेत.

(५) कोणतेही मंत्री, ते उमेदवार असल्याखेरीज किंवा प्राधिकृत प्रतिनिधी असल्याखेरीज किंवा मतदानासाठी मतदार या नात्याने असेल त्याखेरीज मतदान कक्षामध्ये किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करणार नाहीत.

(६) निवडणूक मोहिम/प्रचार यांच्या जोडीने कोणतेही सरकारी काम पार पाडण्यात येऊ नये.

(७) मतदारास आर्थिक किंवा अन्य प्रकारचे कोणतेही प्रलोभन दाखविण्यात येऊ नये.

(८) मतदारांच्या जातीय भावनांना आवाहन करण्यात येऊ नये.

(९) विभिन्न जाती, जमाती यांच्यातील किंवा धार्मिक किंवा भाषिक गटातील सध्याचे मतभेद ज्यामुळे अधिक तीव्र होतील किंवा परस्परातील वैमनस्य वाढेल किंवा त्यांच्यात तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये.

(१०) इतर पक्षांचे कोणतेही नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक कार्याशी संबंधीत नसेल अशा त्यांच्या खाजगी जीवनातील कोणत्याही पैलूवर टीका करण्याची परवानगी देण्यात येऊ नये.

(११) ज्याचा खरेखोटेपणा पडताळून पाहिलेला नाही असे आरोप ठेवून किंवा त्यास विकृत स्वरुप देऊन इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर टीका करण्यात येऊ नये.

(१२) निवडणूक प्रचार तसेच भाषण, निवडणूक प्रचाराचे फलक, संगीत इत्यादी यासाठी देवळे, मशिदी, चर्च, गुरुद्वारे किंवा कोणत्याही प्रार्थनास्थळाचा वापर करू नये.

(१३) लाच देणे, अवाजवी प्रभाव टाकणे, मतदारांना धाक दाखविणे, खोट्या नावाने मतदान करणे, मतदान कक्षापासून १०० मीटरच्या आत निवडणूक प्रचार करणे, मतदानाची वेळ समाप्त होण्याच्या वेळेबरोबर संपणाऱ्या ४८ तासांच्या कालावधीत सार्वजनिक सभा घेणे, मतदारांना मतदान कक्षापर्यंत पोहचविणे व तेथून परत नेणे यासारख्या भ्रष्ट प्रथा किंवा निवडणूक विषयक अपराध करण्यास प्रतिबंध आहे.

CamScanner

(१४) व्यक्तीची मते किंवा कृत्ये याविरुध्द व्यक्त करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने करणे किंवा धरणे धरण्यात येऊ नये.

(१५) कोणत्याही व्यक्तीला, अन्य कोणत्याही व्यक्तीची जमीन, इमारत, आवारभिंत इत्यादीचा वापर त्यांच्या परवानगीखेरीज ध्वजदंड उभारणे, कापडी फलक लावणे, नोटीसी चिकटविणे किंवा घोषणा इत्यादी यासाठी वापर करता येणार नाही. यामध्ये खाजगी व सार्वजनिक जागांचा समावेश असेल.

(१६) इतर राजकीय पक्षाच्या किंवा उमेदवारांच्या सार्वजनिक सभांमध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करण्यात येऊ नये.

(१७) एका पक्षाची जेथे सभा चालू असेल अशा जागी दुसऱ्या पक्षाद्वारे मोर्चा काढण्यात येऊ नये.

(१८) दुसऱ्या पक्षाने किंवा उमेदवाराने काढलेली प्रचारपत्रके काढून टाकण्यात येऊ नये.

(१९) मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वितरीत करण्याच्या जागी किंवा मतदान कक्षानिकट प्रचार पत्रके, पक्षांचे ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करू नये.

(२०) ध्वनीवर्धकांचा मग ते एकाच जागी लावलेले असोत किंवा फिरत्या वाहनांवर बसवलेले असोत, सकाळी ६.०० वाजण्यापूर्वी किंवा रात्री १०.०० वाजल्यानंतर आणि संबंधित प्राधिकाऱ्यांची लेखी परवानगी घेतली असल्याखेरीज वापर करू नये.

(२१) संबंधीत प्राधिकाऱ्यांची पूर्व लेखी परवानगी घेतली असल्याखेरीज सार्वजनिक सभेच्या जागी किंवा मोर्चात ध्वनिवर्धकाचा वापर करू नये. सर्वसाधारणपणे अशा सभा/मोर्चे रात्री १०.०० वाजल्यानंतर चालू ठेवण्याचे परवानगी देण्यात येणार नाही व याखेरीज ती स्थानिक कायदे, त्या क्षेत्रातील सुरक्षिततेच्या आवश्यकतेचा स्थानिक दृष्टिकोन आणि हवामान, सणासुदीचा काळ, परीक्षेची वेळ याच्या अधिनतेने असतील.

(२२) निवडणुकीच्या काळात कोणत्याही प्रकारे मद्याचे वाटप करण्यात येऊ नये.

CamScanner

## राजकीय पक्ष व उमेदवार यांच्या मार्गदर्शनासाठी आदर्श आचार संहिता

**:) सर्वसाधारण आचरण :**

१) कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा उमेदवाराने, वेगवेगळ्या जाती-जमाती, भिन्न धर्मीय किंवा मित्र भाषिक यांच्यामध्ये असलेले मतभेद वाढतील किंवा जातीय वैमनस्य निर्माण होईल, अशा प्रकारच्या कोणत्याही कृत्यामध्ये भाग घेऊ नये.

२) राजकीय पक्षावरील टिका त्या पक्षांचे धोरण आणि कार्यक्रम आणि त्यांचे पूर्वीचे कामकाज एवढ्यापुरतीच मर्यादित असावी. राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांनी इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक कामकाजाशी संबंध नसलेल्या खाजगी जीवनातील गोष्टींवर टीका करण्यापासून नेहमीच दूर रहावे. इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर बिनबुडाचे आरोप करून किंवा त्यांच्या कृत्याचा विपर्यास करून टीका करण्याचे टाळावे.

३) उमेदवारांनी मते मिळविण्यासाठी जातीय आधारावर किंवा जातीय भावनांच्या आधारावर आवाहन करू नये. मशिदी, चर्च, मंदिरे किंवा इतर पूजास्थाने यांचा निवडणुकीच्या प्रचारासाठी मंच म्हणून वापर करता कामा नये.

४) सर्व पक्षांनी व उमेदवारांनी मतदारांना लाच देणे, त्यांना धाक दाखविणे, मतदारांबाबत तोतयागिरी करणे, मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या आत प्रचार करणे, मतदान संपण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेस संपणाऱ्या ४८ तासांच्या मुदतीत सार्वजनिक सभा घेणे आणि मतदान केंद्रापासून मतदारांची ने-आण करणे यासारखे निवडणूक कायद्यान्वये गैर ठरणारे प्रकार व अपराध करण्याचे कटाक्षाने टाळावे.

५) प्रत्येक व्यक्तीचा शांततापूर्ण व निवांत जीवन जगण्याचा अधिकार जपला पाहिजे मग त्या उमेदवाराची किंवा राजकीय पक्षांची राजकीय मते किंवा कामे कितीही प्रतिकूल असोत, कोणत्याही परिस्थितीत, एखाद्या व्यक्तीच्या मतांचा किंवा कामांचा निषेध करण्यासाठी तिच्याविरुध्द निदर्शने करणे किंवा तिच्या घरासमोर धरणे या गोष्टीस थारा देता कामा नये.

६) कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा उमेदवराने ध्वज उभारण्यासाठी, पताका लावण्यासाठी, नोटिसा चिकटवण्यासाठी, घोषणा लिहिण्यासाठी स्वतःच्या परवानगीशिवाय आपल्या अनुयायांना कोणाही व्यक्तीच्या जमिनीचा, इमारतीचा, कुंपणाच्या भिंती इत्यादींचा वापर करून देऊ नये.

७) राजकीय पक्षांनी व उमेदवारांनी आपल्या पक्षात पाठिंबा देणाऱ्या व्यक्ती इतर पक्षांनी आयोजित केलेल्या सभा अथवा मिरवणूका यामध्ये अडथळे आणीत नाहीत किंवा त्या सभा अथवा मिरवणूका उधळून लावीत नाहीत याची खातरजमा करून घ्यावी. एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी किंवा त्या पक्षाविषयी आस्था बाळगणाऱ्यांनी दुसऱ्या राजकीय पक्षाने आयोजित केलेल्या सार्वजनिक सभेत लेखी किंवा तोंडी प्रश्न विचारून स्वतःच्या पक्षाची पत्रके वाटून अडथळा आणता कामा नये. एखाद्या राजकीय पक्षाने ज्या ठिकाणी इतर पक्षाने सभा भरविली असेल त्या रस्त्यावरून मिरवणूक काढता कामा नये. पक्षाने काढलेली भित्तीपत्रके दुसऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी काढून टाकता कामा नये.

CamScanner

**(दोन) सभा :**

१) राजकीय पक्ष किंवा उमेदवाराने याने स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांना रहदारी काबूत ठेवणे आणि शांतता व सुव्यवस्था राखणे शक्य व्हावे म्हणून, आयोजित केलेल्या कोणत्याही सभेचे ठिकाण व वेळ अगोदरच कळविले पाहिजे.

२) ज्या ठिकाणी सभा घेण्याचे योजिले असेल त्या ठिकाणी काही प्रतिबंधक किंवा मनाई करणारे आदेश आहेत किंवा काय याची राजकीय पक्षाने किंवा उमेदवाराने आगाऊ खातरजमा करून घ्यावी. जर असे काही आदेश असतील तर त्यांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. जर या आदेशातून काही सूट हवी असेल तर यासाठी अर्ज करून ती अगोदरच घेण्यात यावी.

३) आयोजित केलेल्या कोणत्याही सभेच्या संबंधात ध्वनीवर्धक किंवा इतर कोणत्याही गोष्टींच्या वापरासाठी परवाना किंवा लायसन्स घ्यावयाचे असेल तर त्या राजकीय पक्षाने किंवा उमेदवाराने संबंधित प्राधिकाऱ्याकडे बऱ्याच अगोदर अर्ज करावा आणि अशी परवानगी किंवा लायसन्स घ्यावे.

४) सभेच्या संयोजकांनी सभेत अडथळे आणणाऱ्या किंवा अन्य प्रकारे अडथळे आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींना आटोक्यात आणण्यासाठी कर्तव्यस्थ पोलीसांची न चुकता मदत घ्यावी. संयोजकाने स्वतःच अशा व्यक्तींच्या विरुध्द कार्यवाही करता कामा नये.

**(तीन) मिरवणूक :**

१) मिरवणूक काढणाऱ्या राजकीय पक्षाने किंवा उमेदवाराने मिरवणुकीची वेळ व ती जेथून निघणार असेल ते ठिकाण, मिरवणूक ज्या मार्गाने जाणार तो मार्ग आणि मिरवणूक जेथपर्यंत न्यावयाची ते ठिकाण व त्या संबंधीची वेळ अगोदर ठरवून घेतली पाहिजे. सर्वसाधारणपणे या कार्यक्रमात काहीही बदल करण्यात येऊ नये.

२) संयोजनकांनी स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांना कार्यक्रमाची आगाऊ सूचना द्यावी म्हणजे पोलीस अधिकाऱ्यांस आवश्यक ती व्यवस्था करणे शक्य होईल.

३) संयोजकांनी मिरवणूक ज्या भागातून जावयाची असेल त्या भागात काही निर्बंधक आदेश काढण्यात आले आहेत किंवा काय याची खातरजमा करून घ्यावी आणि सक्षम प्राधिकाऱ्याकडून खास सूट मिळालेली नसेल तर तशा निर्बंधाचे पालन करावे. रहदारीच्या बाबतीत कोणतेही विनियम किंवा निर्बंध असल्यास, त्यांचे देखील काळजीपूर्वक पालन केले पाहिजे.

४) वाहतुकीची कोंडी होणार नाही किंवा वाहतुकीस अडथळा येणार नाही यादृष्टीने संयोजकांनी मिरवणुकीचा मार्ग ठरवून देण्याची आगाऊ व्यवस्था करावी. जर मिरवणूक खूप मोठी असेल तर तिचे योग्य त्या अंतराने भाग पाडण्यात यावेत. म्हणजे सोयीस्कर अंतरावर विशेष करून जेथे मिरवणूक रस्त्यांच्या जंक्शनवरून जाणार असेल तेथे वाहतूक कोंडी न होता ती टप्याटप्याने सुरु करता येईल.

५) शक्यतोवर रस्त्याच्या उजव्या बाजूने मिरवणूक नियंत्रित करण्यात येईल आणि कर्तव्यस्थ पोलीसांचे निर्देश व सूचना यांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल.

CamScanner

६) दोन किंवा अधिक राजकीय पक्षांनी किंवा उमेदवारांनी एकाच मार्गाने किंवा त्याच भागातून एकाच वेळी मिरवणूक काढायचे ठरविले असेल तर संयोजकांनी अगोदरपासूनच पोलीस यंत्रणेशी संपर्क साधून मिरवणूकीमुळे वाहतुकीत अडथळा येऊ नये म्हणून कोणत्या उपाय योजना करता येतील ते ठरवून घेतले पाहिजे. ही व्यवस्था समाधानकारक व्हावी म्हणून त्यांनी स्थानिक पोलीसांचे सहाय्य घेतले पाहिजे. याकरिता राजकीय पक्षांनी लवकरात लवकर पोलिसांचे सहाय्य घेतले पाहिजे.

७) राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांनी अनिष्ट प्रवृत्तीच्या लोकांकडून विशेषतः प्रक्षुब्धक्षणी ज्या गोष्टींचा दुरुपयोग होण्याची शक्यता आहे. अशा गोष्टी मिरवणुकीत घेऊन जाणाऱ्यांच्या बाबतीत जास्तीत जास्त खबरदारी घेतली पाहिजे.

८) इतर राजकीय पक्षातील व्यक्ती किंवा त्यांचे नेते यांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या प्रतिमा घेऊन जाणे, त्या जाहिररित्या जाळणे आणि अशाच प्रकारचे निदर्शनाचे इतर प्रकार यांना राजकीय पक्षांनी किंवा त्यांच्या उमेदवारांनी थारा देता कामा नये.

**ार) मतदानाचा दिवस :**

**ां राजकीय पक्ष व उमेदवार यांनी –**

१) मतदान शांततेने व व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी आणि कोणताही उपद्रव किंवा अडथळा न होता मतदारांना आपला अधिकार बजावण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळावे म्हणून मतदानाच्या दिवशी अधिकाऱ्यांशी सहकार्य करावे.

२) आपल्या अधिकृत कार्यकर्त्यांना आवश्यक ते बिल्ले व ओळखपत्र द्यावीत.

३) त्यांनी आपल्या मतदारांना पुरविलेली ओळखपत्रे कोऱ्या (सफेद) कागदावर असावीत आणि त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवारांचे नाव किंवा पक्षाचे नाव असता कामा नये.

४) मतदानाच्या दिवशी किंवा तत्पूर्वी २४ तासात मद्य पाजण्याचे किंवा वाटण्याचे टाळले पाहिजे.

५) राजकीय पक्षांनी व उमेदवारांनी मतदान केंद्राशेजारी उभारलेल्या तंबूजवळ निष्कारण गर्दी जमू देऊ नये. म्हणजे पक्षाचे कार्यकर्ते व हितचिंतक तसेच उमेदवार यांच्यामध्ये तणाव निर्माण होणार नाही.

६) उमेदवारांचे तंबू अगदी साधे असावेत तेथे कोणत्याही प्रकारची भित्तीपत्रके, ध्वज चिन्हे किंवा प्रचाराची इतर कोणतीही सामग्री नाही याची खातरजमा करून घ्यावी. तेथे कोणत्याही प्रकारचे खाद्यपदार्थ देण्यात येऊ नयेत किंवा गर्दी जमू देऊ नये.

७) मतदानाच्या दिवशी वाहने सोडण्यावर जे निर्बंध लादण्यात आले असतील त्यांचे पालन करण्यात प्राधिकाऱ्यांशी सहकार्य करावे व या वाहनांसाठी परवाना घेऊन तो या वाहनांवर ठळकपणे दिसेल अशा रितीने लावावा.

**च) मतदान केंद्र :**

मतदारांखेरीज निवडणूक आयोगाचा कायदेशीर पास असल्याशिवाय कोणीही मतदान केंद्रात प्रवेश करता कामा नये.

**छ) निरीक्षक :**

निवडणूक आयोगाकडून निरीक्षकांची नेमणूक करण्यात येते. उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना निवडणुकीच्या नकाजासंबंधात जी काही विवक्षित तक्रार किंवा अडचण असेल तर त्यांनी ती निरीक्षकांच्या निदर्शनास आणावी.

CamScanner

**(सात) सत्ताधारी पक्ष :**

सत्ताधारी पक्षाने - मग तो केंद्रात असो व संबंधित राज्यात- निवडणूक मोहिमेच्या प्रयोजनासाठी आपल्या अधिकृत सत्तेचा वापर केला आहे. अशा तक्रारीच्या जागा उरणार नाही याची खबरदारी घ्यावी आणि विशेषतः

१) अ) मंत्रीमहोदयांनी आपल्या सरकारी दौऱ्याची निवडणुकीच्या कामाकाजाशी सांगड घालू नये आणि निवडणुकीच्या कामाच्या वेळी सरकारी यंत्रणा किंवा कर्मचारी वर्ग यांचा वापर करता कामा नये.

ब) सरकारी विमाने, वाहने इत्यादी यंत्रणा आणि कर्मचारीवर्ग यांचा सत्तारुढ पक्षाच्या हिताकरीता वापर करता कामा नये.

२) निवडणुकीच्या सभा घेण्यासाठी मैदाने इत्यादीसाठी सार्वजनिक जागांची तसेच निवडणुकीच्या कामासाठी, विमान प्रवासासाठी हेलीपॅडचा वापर करणे ही सत्ताधारी पक्षाची मक्तेदारी असता कामा नये. इतर पक्ष व उमेदवार यांना देखील सत्तारुढ पक्ष ज्या अटी व शर्तीवर अशा ठिकाणांचा वापर करीत असेल त्याच अटीवर व शर्तीवर वापर करण्याची मुभा असावी.

३) शासकीय विश्रामगृहे, डाक बंगले किंवा इतर शासकीय निवास व्यवस्था यावर फक्त सत्ताधारी पक्षांचा किंवा त्यांच्या उमेदवारांचाच हक्क असू शकणार नाही आणि अशा निवास व्यवस्थेचा वापर इतर पक्षांना व उमेदवारांनाही न्याय्य पध्दतीने करून देता येईल. मात्र, कोणत्याही पक्षाला किंवा उमेदवाराला अशी निवास व्यवस्था (तीन संलग्न असलेल्या जागेसह) निवडणूक मोहिमेच्या कार्यालयांसाठी किंवा निवडणूक प्रचाराच्या कामासाठी सार्वजनिक सभा घेण्याच्या प्रयोजनासाठी वापरता येणार नाही.

४) सत्ताधारी पक्षाने, निवडणुकीतील यशाची संभाव्यता वाढेल यादृष्टीने एकांगी राजकीय वृत्त देण्यासाठी आणि त्या पक्षाने केलेल्या प्रगतीसंबंधात निवडणुकीच्या कालावधीमध्ये वृत्तपत्रांमध्ये आणि इतर माध्यमांद्वारे सरकारी तिजोरीतील खर्चाने जाहिरात देण्याची आणि सरकारी लोकमाध्यमाचा गैरवापर करण्याचे कटाक्षाने टाळावे.

५) आयोगाने निवडणूक जाहीर केल्यापासून मंत्र्यांनी किंवा इतर प्राधिकाऱ्यांनी स्वेच्छानिधीतून अनुदानाची/प्रदानाची रक्कम मंजूर करता कामा नये.

६) आयोगाकडून निवडणूक जाहीर करण्यात येईल तेव्हापासून मंत्री किंवा इतर प्राधिकारी यांनी ज्यामुळे सत्ताधारी पक्षाच्या बाजूकडे मतदार आकर्षित होतील असे-

अ) कोणत्याही स्वरुपात कोणतेही वित्तीय अनुदान किंवा त्यासंबंधीचे आश्वासन देता कामा नये, किंवा

ब) कोणत्याही प्रकारच्या प्रकल्पाची किंवा योजनेची कोनशिला बसविता कामा नये, किंवा

क) रस्ते बांधण्याचे, पिण्याच्या पाण्याची सोय करण्याचे आश्वासन देता कामा नये, आणि

ड) शासन सार्वजनिक उपक्रम, इत्यादींमध्ये कोणत्याही तदर्थ नेमणूका करणे इ.

७) केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या मंत्रीमहोदयांनी, उमेदवार किंवा मतदार किंवा अधिकृत प्रतिनिधी असल्याखेरीज करून कोणत्याही मतदान केंद्राच्या ठिकाणी किंवा मजमोजणीच्या जागी प्रवेश करता कामा नये.

CamScanner

## प्रेस कौन्सिलची मार्गदर्शक तत्वे

आगामी निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय प्रेस परिषदेने (प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया) निवडणूक विषयक वृत्त प्रसिध्द करण्यासंदर्भात वृत्तपत्रे, पत्रकार आदिंसाठी मार्गदर्शक तत्वे जाहीर केलेली आहेत.

निवडणूक व निवडणूक रिंगणातील उमेदवारांसंदर्भात वस्तुनिष्ठ वृत्त देणे हे सर्व वृत्तपत्रांचे कर्तव्य आहे. वृत्तपत्रांनी निवडणूक प्रचारात भाग घेऊ नये व निवडणुकीच्या दरम्यान होणाऱ्या घटनांची अवास्तव वृत्ते प्रसिध्द करू नयेत अशी अपेक्षा आहे. प्रत्यक्ष प्रचाराचे वृत्त देताना उमेदवाराने मांडलेला कोणताही महत्वाचा मुद्दा वगळू नये.

धार्मिक किंवा जातीय आधारावर निवडणूक प्रचारास निवडणूक नियमांनुसार बंदी आहे. त्यामुळे वृत्तपत्रांनी धार्मिक भावना भडकून तेढ वाढेल अशी वृत्ते वगळावीत.

एखादा पक्ष वा उमेदवारावर शहानिशा न करता केलेले आरोप वृत्तपत्रांनी प्रसिध्द करू नये. कुठल्याही उमेदवाराच्या खाजगी जीवनावरील किंवा उमेदवाराची वर्तणूक किंवा निवडणूक रिंगणातून माघार घेत असल्याबाबतचे खोटे विधान वृत्तपत्रांनी प्रसिध्द करू नये. कुठल्याही पक्षाने अथवा उमेदवाराने देऊ केलेले आर्थिक किंवा कुठल्याही स्वरुपातले प्रलोभने वृत्तपत्रांनी स्वीकारू नये. वृत्तपत्रांनी एखादा विशिष्ट उमेदवार किंवा पक्षाचाच प्रचार करू नये. तसे केल्यास इतर उमेदवार किंवा पक्षाला त्यांची बाजू मांडण्याचा हक्कही द्यावा.

सार्वजनिक पैशातून एखाद्या सत्ताधारी पक्षाने दिलेली जाहिरात वृत्तपत्रांनी स्विकारू नये. जिल्हा निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून वेळोवेळी आलेले आदेश, सूचना वृत्तपत्रांनी पाळाव्यात.

**निवडणूक सर्वेक्षणासंदर्भात मार्गदर्शिका :**

निवडणूकपूर्व सर्वेक्षण प्रसिध्दी करणाऱ्या वृत्तपत्रांनी ते सर्वेक्षण करणारी संस्था, व्यक्ती यांच्याविषयी माहिती द्यावी. त्यांनी निवडलेले नमुने (सॅम्पल), निवड पध्दत, त्यांचे स्वरुप याचाही योग्य विचार करावा.

संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वृत्तपत्रांनी व माध्यमांनी एक्झिट पोल सर्वेक्षण प्रसिध्द करू नये. निवडणूक प्रक्रिया लोकशाहीचा भक्कम कणा आहे. या निवडणूका मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी वृत्तपत्रांनी प्रयत्न करावेत.

## इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची माहिती

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे हा सरकार निवडण्याचा श्रेष्ठ, सोपा आणि आर्थिकदृष्ट्या फायद्याचा मार्ग आहे. ही यंत्रे मे. इलेक्ट्रॉनिक कार्पोरेशन ऑफ इंडिया, लिमिटेड, हैद्राबाद आणि मे. भारत इलेक्ट्रॉनिक लिमिटेड, बेंगलोर यांनी तयार केली आहेत.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात दोन संच आहेत, पहिले नियंत्रण संच आणि दुसरे मतपत्रिका संच व नियंत्रण संच हे मतदान केंद्रातील मतदार केंद्राध्यक्षाकडे असते आणि मतपत्रिका संच व नियंत्रण संच पाच मीटर लांबीच्या केबलने एकमेकांस जोडली जातात. एक मतपत्रिका संचामध्ये कमाल सोळा उमेदवारांचा समावेश करता येतो

चार मतपत्रिका संच एका नियंत्रण संचाशी जोडून जास्तीत जास्त ६४ उमेदवारांचा समावेश करण्यात येतो. मतपत्रिका संचामधील मतपत्रिकेवर निवडणूक तपशील, अनुक्रमांक, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे आणि चिन्हे दर्शविण्यासाठी तरतूद असते. प्रत्येक उमेदवाराच्या नावासमोर एक निळे बटन असते. मतदार आपल्या पसंतीच्या उमेदवारांच्या नावासमोरील निळे बटन दाबून मत नोंदवू शकतो.



CamScanner

या बटणाच्या बाजूलाच प्रत्येक उमेदवारासाठी एक दिवा असतो. मतदार जेव्हा आपले मत नोंदविण्यासाठी हे बटन दाबतो तेव्हा हा दिवा लाल पेटतो आणि बीप असा आवाजही ऐकू येतो. यानंतर अवघ्या १२ सेकंदानी मतदान केंद्राध्यक्ष परत मतपत्रिका संच दुसऱ्या उमेदवारासाठी तयार ठेवू शकतो. याचा अर्थ असा की, एका मिनिटात ५ मते आणि प्रत्येक तासात जास्तीत जास्त ३०० मते नोंदणीसाठी या यंत्राची रचना केलेली आहे.

## पेड न्यूज

प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने रोख रक्कम किंवा अन्य स्वरुपाच्या अमिषाने एखादी बातमी किंवा विश्लेषण प्रसिध्द होण्याला पेड न्यूज अशी व्याख्या केली आहे. निवडणूक प्रचारात पेड न्यूजनी अलिकडेच प्रवेश केल्याचे दिसून आले. मात्र २००९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर पेड न्यूजचा माध्यमात शिरकाव झाला. निवडणुकीत उमेदवारास खर्च करण्यावर मर्यादा असल्याने पेड न्यूजच्या माध्यमातून तो आपला प्रचार करत असल्याचं अनेकदा दिसते. बातमीच्या स्वरुपात प्रसिध्द होत असते. या बातमीसाठी पैसे दिलेले असतात, पण या पैसे दिल्याची पावती दिली जात नाही. एखादी बातमी किंवा विश्लेषण पेड न्यूज आहे. हे पुराव्यानिशी सादर करण आवश्यक असते.

निवडणूकांच्या काळात आणि एरवी देखील बातमी कशी असावी? बातमी ही नेहमी वस्तुनिष्ठ, प्रामाणिक आणि तटस्थ असली पाहिजे. विश्लेषण तर अशाच स्वरुपात असलं पाहिजे. बातमी किंवा विश्लेषण वाचल्यानंतर वाचकाला आपल्याला वस्तुनिष्ठ माहिती मिळाली याच समाधान मिळालं पाहिजे.

८ जून २०१० रोजी निवडणूक आयोगाने प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला पत्र पाठवून निवडणुकीच्या काळात पेड न्यूज थांबविण्यासाठी काय करावं याची मार्गदर्शिका पाठविली आहे. जिल्हा आणि राज्यस्तरावर निवडणूक आयोग मिडीया सर्टिफिकेशन ॲण्ड मॉनिटरिंग कमिटी बनविते. जाहिरातींना मान्यता देणे आणि पेड न्यूजवर लक्ष ठेवण्याची महत्वाची कामगिरी या कमिटीकडे निवडणूक आयोगाने दिली आहे. जिल्हास्तरीय कमिटी प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांची छाननी करून एखादी पेड न्यूज तर नाही ना याची चौकशी करते. निवडणूक आयोगाने अशा स्वरुपाची यंत्रणाच बनविली आहे.

## सोशल मिडिया

सोशल मिडियाचे स्थूलमानाने पाच वेगवेगळे प्रकार आहेत.

(क) सहयोगात्मक प्रकल्प (उदाणार्थ विकीपिडीया )

(ख) ब्लॉग्ज् व सूक्ष्म ब्लॉग्ज् ( उदाहरणार्थ ट्विटर)

(ग) कंटेड कम्युनिटीज (उदाहणार्थ यु ट्युब )

(घ) सोशल नेटवर्कींग साईट्स (उदाहरणार्थ फेसबुक )

(ङ) व्हर्चुअल गेम वर्ल्ड्स (उदाहरणार्थ ॲप्स)

निवडणूक मोहिमेशी संबंधित असलेल्या कायदेशीर तरतुदी, या इतर कोणत्याही प्रसारमाध्यमाचा वापर करणाऱ्या निवडणूक मोहिमेच्या कोणत्याही इतर स्वरुपाला ज्या पध्दतीने लागू होतात त्याच पध्दतीने सोशल मिडियाला लागू होतात सोशल मिडिया हे प्रसार माध्यमांचे सापेक्षतेचे नवीन स्वरुप असल्यामुळे सर्व संबंधितांना पुढील सूचनांद्वारे स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे.

CamScanner

**अ. उमेदवारांकडून त्यांच्या सोशल मिडिया खात्यांबाबत द्यावयाची माहिती.**

उमेदवारांनी नामनिर्देशने पत्रे दाखल करावयाच्या वेळी नमुना-२६ मध्ये प्रतिज्ञापत्रे दाखल करणे आवश्यक आहे. सविस्तर सूचना व ज्या नमुन्यात प्रतिज्ञापत्रे दाखल करावयाची आहेत तो नमुना सोबत जारी करण्यात आला आहे. पहा आयोगाचे पत्र क्रमांक ३/४/२०१२/ एसडीआर दिनांक २४ ऑगस्ट २०१२ या नमुन्याच्या परिच्छेद ३ नुसार असे बंधनकारक आहे की, उमेदवाराचा ई-मेल आयडी असल्यास या नमुन्यातून आयोगाला कळविण्यात यावा. आयोगाला असे आवश्यक वाटते की, उमेदवाराचे अधि प्रमाणित सोशल मिडिया खाते हे देखील आयोगाला कळविण्यात यावेत. ही माहिती पुढीलप्रमाणे उक्त परिच्छेद ३ मध्ये सादर करण्यात यावी.

'माझा संपर्क दूरध्वनी क्रमांक ........................................असा आहे / असे आहेत.'

'माझा ई-मेल आयडी ..................................असा आहे आणि माझे सोशल मिडिया खाते (असल्यास) ............................असे आहे.'

**ब. राजकीय जाहिरातींचे पूर्व-प्रमाण**

भारताच्या सर्वोच्च न्यायालयातील (एसएलपी) विशेष अनुज्ञा विनंती अर्जाच्या संदर्भात दिलेला (दिवाणी) एन. ६६७९ २००४, दिनांक १३ एप्रिल २००४ आदेशानुसार आयोगाने या विषयासंबधात त्याचा आदेश क्रमांक ५०९/७५/२००४/जेएस-/४५७२ दिनांक १५-४-२००४ यात तपशीलवार सूचना दिल्या आहेत. या आदेशात असे नमूद करण्यात आले की, दूरदर्शन ाहिन्या आणि / किंवा केबल नेटवर्क यावर जाहिरात देण्याचा प्रस्ताव करणाऱ्या प्रत्येक नोंदणीकृत/राष्ट्रीय किंवा राज्य तरावरील राजकीय पक्षाला आणि निवडणूक लढवणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला, प्रसिध्दी करण्यापूर्वी इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमावर र्व राजकीय जाहिरातींच्या पूर्व प्रमाणनाकरिता भारतीय निवडणूक आयोग/पदनिर्देशित अधिकारी यांच्याकडे अर्ज करावा ागेल. सदर आदेशात त्यानंतर फेरबदल करण्यात आला आणि एकत्रिकृत करण्यात आला.

पहा आयोगाचा आदेश दिनांक २७-८-२०१२ ज्यात जिल्हा व राज्य स्तरावरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण मित्यांवर इतर कार्ये म्हणजेच पेड न्यूज इत्यादी विरुध्द कार्य करणे, अशा कार्यासोबत अशा जाहिरातींच्या पूर्व प्रमाणनाच्या बाबदाऱ्या सोपविण्यात आल्या होत्या. सामाजिक प्रमारमाध्यम वेबसाईटस या देखील व्याख्येनुसार इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यम सल्यामुळे, आयोगाचा आदेश क्रमांक ५०९/७५/२००४ /जेएस- १/४५७२, दिनांक १५-४-२००४ यात समाविष्ट असलेल्या चना यादेखील त्यात योग्य ते फेरबदल करुन, सामाजिक प्रसारमाध्यमे वेबसाईटसहित सर्वच वेबसाईट्सना लागू होतील आणि ा पूर्व प्रमाणकाच्या कक्षेत असतील म्हणून आपणांस कोणत्याही इंटरनेट आधारित प्रसारमाध्यम / वेबसाईट ज्यांत सामाजिक ारमाध्यम वेबसाईटसचाही समावेश आहे. त्यामध्ये त्याच नमुन्यात आणि पूर्वोक्त आदेशात निर्दिष्ट केलेल्या त्याच कार्यपध्दतीचे नुकरण करुन सक्षम प्राधिकाऱ्याकडून पूर्व प्रमाणनाशिवाय राजकीय पक्ष / उमेदवार यांद्वारे कोणत्याही राजकीय जाहिराती ग्यात येत नाहीत, याबाबत खात्री करुन घेण्यासाठी विनंती करण्यात येत आहे.

**. सामाजिक प्रसारमाध्यम वेबसाईटसह इंटरनेटद्वारे प्रचार करण्याबाबतचा खर्च**

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ याच्या कलम ७७, पोटकलम (१) अनुसार प्रत्येक उमेदवाराने निवडणुकीच्या संबंधात ांच्याकडून किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीकडून किवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती नामनिर्देशन दाखल केल्याचा नांक व निवडणुकीचा निकाल जाहिर होण्याचा दिनांक यांत दोन्ही दिनांकाचा समावेश असून, झालेल्या खर्चाचा स्वतंत्र व चूक हिशोब ठेवणे आवश्यक आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने २००५ मध्ये कॉमन कॉज विरुध्द भारत सरकार सामाईकवाद भारत संघराज्य यात असा आदेश दिला की, राजकीय पक्षांनी देखील निवडणुकीच्या खर्चाचे विवरणपत्र भारतीय निवडणूक

CS CamScanner

आयोगाला सादर करावे आणि अशी विवरणपत्रे विधानसभा निवडणूक झाल्यानंतर ७५ दिवसांच्या आत आणि लोकसभा निवडणूका झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक आहे. हे उघड आहे की, सामाजिक प्रसारमाध्यमातील कोणत्याही जाहिरातीद्वारे निवडणूक मोहिमेवरील खर्च हा निवडणूकांच्या संबंधातील सर्व खर्चाचा एक भाग आहे.

कोणत्याही संदिग्धता काढून टाकण्याकरिता याद्वारे असा निदेश देण्यात येत आहे की, उमेदवार व राजकीय पक्ष हे अचूक हिशोब ठेवण्यासंबधी आणि खर्चाचे विवरणपत्र सादर करण्यासंबंधीचा तसेच प्रचार करण्याबातच्या सर्व खर्चाचा समावेश करतील यात सामाजिक प्रसारमाध्यमावरील जाहिरातीवर झालेल्या खर्चाचा देखील समावेश आहे. इतर बाबींसहित यामध्ये जाहिरात प्रसिध्दी करण्यासाठी इंटरनेट कंपन्या व वेबसाईट यांना केलेल्या प्रदानांचा आणि तसेच प्रचाराशी संबंधित कार्यात्मक खर्च सृजनशील मजकूर विकसीत करण्यावर झालेला कायात्मक व्यवहार खर्च, वेतनांवरील व्यवहार खर्च आणि अशा उमेदवारांकडून आणि राजकीय पक्षांकडून त्यांचा सामाजिक प्रसारमाध्यम व्यवहार खर्च आणि अशा उमेदवारांकडून आणि राजकीय पक्षांकडून त्यांचा सामाजिक प्रसारमाध्ये खाते इत्यादी सांभाळण्याकरिता सेवानियुक्त केलेल्या कार्यकर्त्यांच्या पथकरात प्रदान केलेल्या मजुरीचा देखील समावेश असेल.

**ड. सोशल मिडियासह इंटरनेटवरील मजकुराशी संबंधित आदर्श आचारसंहिता लागू करणे.**

आयोगाकडून निवडणूका जाहिर करण्यात आल्याच्या दिनांकापासून निवडणूका पूर्ण होईपर्यंत, राजकीय पक्ष व उमेदवार यांच्यासंबंधात निवडणूकांच्या कालावधीत अंमलात असणारी आयोगाची आदर्श आचारसंहिता असते. असे स्पष्ट करण्यात येते की, आदर्श आचार संहितेच्या तरतुदी व वेळोवेळी आयोगाद्वारे देण्यात आलेल्या संबंधित सूचना या देखील इंटरनेटवर सामाजिक प्रसारमाध्यम संकेतस्थळासहित उमेदवारांकडून, राजकीय पक्षांकडून नोंद करण्यात आलेल्या मजकुराला लागू होईल.

**इ.**

जेथवर उमेदवार व राजकीय पक्ष या व्यतिरिक्त इतर व्यक्तीद्वारे नोंद करण्यात आलेल्या मजकुराचा संबंध आहे. तेथवर आयोग, सदर बाबीचा जोवर तिचा संबध आहे तोवर किंवा ती राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्या निवडणूक प्रचार कार्याशी संयुक्तरित्या जेथवर जोडता येईल तेथवर व्यावहारिक मार्गाने या बाबीचा परामर्श घेण्यासाठी, आयोग, दळणवळण व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाशी विचारविनिमय करुन सदर बाबींसंबंधी विचार करीत आहे. या सूचना त्वरित आवश्यक कार्यवाहीकरिता उमेदवार, राजकीय पक्ष, प्रचारमाध्यमे व निवडणूक निरीक्षक यांच्यासह सर्व संबंधितांच्या निदर्शनास कृपया आणून देण्यात याव्यात.

CamScanner